# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 11 July 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ११ जूलै २०२५ दुपारी १.०० वा.

****

सोळाव्या रोजगार मेळाव्याअंतर्गत उद्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ५१ हजार युवकांना शासकीय नोकरीचे नियुक्तीपत्रं प्रदान करण्यात येणार आहेत. देशभरात ४७ ठिकाणी हा मेळावा होणार आहे.

****

जागतिक लोकसंख्या दिन आज पाळण्यात येत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण होणारी आव्हाने आणि संधींवर लक्ष केंद्रित करण्यासाठी, लोकसंख्येशी संबंधित चिंतांना तोंड देण्यासाठी आणि शाश्वत भविष्यासाठी काम करण्याची आठवण करून देण्यासाठी हा दिवस पाळला जातो. या दिनाची यंदाची संकल्पना “माँ बनने की उमर वही, जब तन और मन की तैयारी सही” अशी आहे. ही संकल्पना शारीरिक आणि भावनिक तयारीसह पालकत्वासाठी माहितीपूर्ण आणि सक्षम निर्णयांचं महत्त्व अधोरेखित करते.

हा दिवस कुटुंब नियोजनाबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी आणि लोकसंख्या-संबंधित आव्हानांना तोंड देण्यासाठी भारताची वचनबद्धता दर्शवतो, असं केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांनी सामाजिक माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. सरकार देशभरात आवश्यक कुटुंब नियोजन सेवा पुरवत आहे, कुटुंबांना सक्षम बनवत आहे आणि आयुष्मान भारत योजनेसह सार्वजनिक आरोग्य सुविधांद्वारे निरोगी भारताचा मार्ग मोकळा करत असल्याचं त्यांनी नमूद केलं.

****

भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्लासह अन्य तीन सदस्यांचा समावेश असलेलं एक्जिओम फोर हे अंतराळयान येत्या १४ तारखेला आपली १४ दिवसांची मोहीम संपवून पृथ्वीवर परतीचा प्रवास सुरु करेल. अमेरिकेच्या नासा या अंतराळ संस्थेनं ही माहिती दिली आहे. काही तास परतीच्या प्रवासानंतर अमेरिकेत कॅलिफोर्निया

इथं प्रशांत महासागरात हे यान उतरेल. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात पोहोचलेले शुभांशु शुक्ला हे पहिले भारतीय आहेत. शुभांशु शुक्ला यांनी या मोहिमेत भारताला सोपवलेल्या कामगिरी अंतर्गत सात प्रयोग केले आहेत.

****

विकसित भारत २०४७ हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी युवकांच्या बदलत्या विचारसरणीला स्वीकारणं अत्यावश्यक असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मुंबईत काल युवा धोरण समितीच्या बैठकीत ते बोलत होते. या धोरणात नव्या आव्हानांना तोंड देणाऱ्या युवकांचा समावेश करुन शहरी आणि ग्रामीण युवकांना समान संधी मिळण्यासाठी प्रशिक्षण दिलं जाणार आहे. सुविधा आणि योजनांचा समावेश असलेलं समतोल धोरण आवश्यक असून, शाळा, महाविद्यालयं, समाज माध्यमं आणि सेवा क्षेत्रातील प्रतिनिधींना धोरणनिर्मितीत थेट सहभागी करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. युवकच भारताचं भविष्य घडवतील, फक्त त्यांना योग्य दिशा आणि संधी देणं आपली जबाबदारी असल्याचं त्यांनी नमूद केलं.

दरम्यान, मुंबईत काल 'सिंदूर पुला'चं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आलं. ब्रिटीश गव्हर्नर कर्नाकच्या नावावरून ओळखला जाणारा पूल, आता भारतीय सैन्याच्या 'ऑपरेशन सिंदूर' च्या स्मृतीप्रती श्रद्धांजली ठरला आहे. हा पूल केवळ वाहतुकीचा मार्ग नाही, तर तो भारतीय शौर्याची साक्ष असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

****

कामगारांच्या कुटुंबियांनी शासनाच्या शिक्षण आणि आरोग्य सुविधांचा लाभ घ्यावा, असं आवाहन नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केलं आहे. जिल्हा प्रशासनाच्या वतीने नाविण्यपूर्ण उपक्रमांतर्गत कामगार बांधवांचं जीवनमान उंचावण्यासाठी तसंच असंघटीत क्षेत्रातल्या कामगारांना शासनाच्या विविध योजना लाभ देण्यासाठी आयोजित, कामगारांची नोंदणी आणि आरोग्य शिबिर कार्यक्रमात ते बोलत होते. या शिबिराच्या माध्यमातून महिला, असंघटीत कामगार यांना आरोग्य, शिक्षणासह इतर विविध सुविधांचा लाभ एकाच ठिकाणी देण्यात येत आहे. या शिबिरात एकूण ४९१ कामगार रुग्णांची तपासणी करण्यात आली, १४५ लोकांना आयुष्यमान कार्ड वितरीत करण्यात आले, तर २२५ कामगारांची ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करण्यात आली.

****

यंदाच्या खरिप हंगामासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत शेतकऱ्यांनी ३१ जुलैपर्यंत पीक विमा काढून आपलं पीक संरक्षित करावं, असं आवाहन हिंगोलीचे जिल्हाधिकारी तथा जिल्हास्तरीय पीक विमा समिती अध्यक्ष राहुल गुप्ता यांनी केलं आहे. खरीप हंगामातील ज्वारी, तूर, मूग, उडीद, सोयाबीन कापूस अशी पिकं विम्याअंतर्गत येत असून, अधिसूचित क्षेत्रातले कर्जदार आणि बिगरकर्जदार शेतकरी दोघांनाही या योजनेत सहभागी होता येणार आहे. त्यासाठी ई-पीक पाहणी तसंच ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक बंधनकारक करण्यात आले आहेत.

****

क्रिकेट

भारत आणि इंग्लंडदरम्यान सुरु असलेल्या अँडरसन-तेंडुलकर कसोटी मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात इंग्लंड आपल्या पहिल्या डावात आज चार बाद २५१ धावांपासून पुढे खेळेल. दुपारी साडे तीन वाजता हा खेळ सुरु होईल. काल नाणेफेक जिंकून इंग्लंडच्या संघाने फलंदाजीला सुरुवात केली. भारताकडून नितीश कुमार रेड्डीने दोन, तर रविंद्र जडेजा आणि जसप्रित बुमराहने प्रत्येकी एक गडी बाद केला.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या जायकवाडी धरणार पाण्याची आवक मंदावली आहे. धरणाचा पाणीसाठा सुमारे ७१ टक्क्यापर्यंत गेला आहे.

****